दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक ६१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.२५ मे २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पालकमंत्री आदिती तटकरेंच्या हस्ते करंजाडे नागरी आरोग्य उपकेंद्राचे उद्‌घाटन

## सिडकोकडून पनवेल पंचायत समिती ग्रामीण आरोग्य विभागाकडे उपकेंद्राचे हस्तांतर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे नागरी आरोग्य उपकेंद्राचे उदघाटन आज पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. करंजाडे, चिंचपाडा परिसरातील नागरी आरोग्य उपकेंद्राची इमारत यापूर्वीच बांधून तयार आहे. सिडको हे केंद्र जिल्हा परिषदेकडे हस्तांतर करणार होते. मात्र सातत्याने केलेला संघर्ष व पाठपुराव्यामुळे हे उपकेंद्र अखेर सिडकोकडून पनवेल पंचायत समिती ग्रामीण आरोग्य विभागाकडे हस्तांतर करण्यात आले. सोमवारी रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते फीत कापून या उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याठिकाणी येत्या दोन दिवसात कोविड लसीकरण केंद्र सुरु होणार असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

सदर उदघाटनप्रसंगी तहसीलदार विजय तळेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी सुधाकर मोरे, गटविकास अधिकारी लता मोहिते, सिडको आरोग्य अधिकारी डॉ.बी एस बाविस्कर, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजयकुमार लांडगे, तालुका आरोग्य अधिकारी सुनील नखाते, ग्रामसेवक, डी.यु. देवरे, प्रेमसिंग गिरासे, करंजाडे सरपंच रामेश्वर आंग्रे, पोलीस पाटील कुणाल लोंढे, राष्ट्रवादीचे सरचिटणीस प्रशांत पाटील, गणेश कडू, शिवदास कांबळे, जि.प.सदस्य रवींद्र पाटील, ध्रुव बोरकर, प्रल्हाद केणी, नंदकुमार मुंडकर, गौरव गायकवाड, भरत राणे, अनिल केणी, निलीमा भगत, श्रीमती केरेकर, श्रीमती रसाळ, श्रीमती प्रभू आदी उपस्थित होते.

करंजाडे वसाहतीचे नागरीकरण आणि विस्तार झपाट्याने होत आहे. त्यामुळे नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे.



करंजाडेतील नागरिकांना खाजगी दवाखान्यात महागडे उपचार घेताना अनेक अडचणी येत आहेत. त्यामुळे सिडकोने सुरवातीलाच याठिकाणी प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची सोय करणे अपेक्षित होते. दरम्यान या ठिकाणी प्राथमिक उपकेंद्र सुरु करावे हि मागणी यापूर्वीचीच आहे. खाजगी रुग्णालयात सर्दी खोकला आणि साधा ताप असला तरी उपचार दिले जात नाहीत. सर्वच रुग्णाकडे कोरोनाच्या नजरेतून पाहिले जात आहे. त्यामुळे करंजाडे परिसरातील रहिवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. त्याचबरोबर खाजगी रुग्णालायत उपचार घेणे अनेकांना परवडणारे नाही.

करंजाडे परिसरातील सिडकोने बांधकाम केलेले प्राथमिक नागरी आरोग्य उपकेंद्र बंद अवस्थेत होते. हे आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी विविध स्तरावरून पाठपुरावा सुरु होता. गेल्या काही दिवसांपूर्वी जिल्हा परिषद आरोग्य विभाग व सिडको आरोग्य विभागाच्या समन्वयाने हे आरोग्य उपकेंद्र पनवेल पंचायत समिती आरोग्य विभागाकडे हस्तांतर करण्यात आले. त्यानुसार हे उपकेंद्र सुरु करण्याच्या हालचाली सुरु झाल्या. आणि सोमवारी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते फीत कापून या आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले. करंजाडे नागरी आरोग्य उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले असून, येत्या दोन दिवसात या उपकेंद्रामध्ये कोविड लसीकरणाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

> करंजाडे नोडमध्ये सिडकोमार्फत आरोग्य केंद्र इमारतीची उभारणी करण्यात आली आहे. परंतु तेथे कोणत्याही प्रकारची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली नव्हती. याठिकाणी दोन दिवसात लसीकरण केंद्र सुरू होणार आहे. लवकरात लवकर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र सुरू व्हावे जेणेकरून या केंद्राच्या माध्यमातून सर्वसामान्यांना आरोग्यविषयक सुविधांचा लाभ होईल.
>
> **- रामेश्वर आंग्रे (सरपंच, करंजाडे)**

# जिल्हा वार्षिक नियोजन निधीच्या माध्यमातून पोलीस विभागाचे बळकटीकरण

## आदिती तटकरे यांच्या हस्ते वाहने रायगड पोलीस विभागाकडे सुपूर्द



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हा वार्षिक नियोजनच्या निधीतून खरेदी करण्यात आलेल्या ४ स्कॉर्पिओ, १० बोलेरो जीप व १० मोटारसायकली पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते आज पोलीस कवायत मैदान, अलिबाग येथे पोलीस विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्या.

यावेळी खासदार सुनिल तटकरे, सर्वश्री आमदार भरतशेठ गोगावले, महेंद्र दळवी, अनिकेत तटकरे, महेंद्र थोरवे, जि.प.अध्यक्षा योगिता पारधी, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती दिलीप भोईर, अलिबाग नगर परिषद बांधकाम सभापती अजय झुंजारराव, नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन गुंजाळ,पोलीस उपअधीक्षक सोनाली कदम, तहसिलदार सचिन शेजाळ, पोलीस विभागाचे अधिकारी व इतर कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम पोलीस कवायत मैदानात आगमन झाल्याबरोबर पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांना पोलीस दलाकडून सलामी देण्यात आली. त्यानंतर नव्या वाहनांचे उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले व पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांकडे नव्या वाहनांच्या चाव्या सुपूर्द करण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी कोविड संकटात पोलीस विभागाने केलेल्या उल्लेखनीय कामाबद्दल पोलीस विभागाचे कौतुक केले. तसेच पोलीस कवायत मैदानाच्या संरक्षक भिंतीचे काम जिल्हा वार्षिक योजनेतून लवकरच पूर्ण करण्यात येईल, असेही सांगितले. त्यांनी कोविडच्या प्रादूर्भावामुळे निधन पावलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहोत, या सांत्वनपर शब्दात निधन झालेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना यावेळी श्रध्दांजली वाहिली.

> **जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास तसेच, पोलीस बंदोबस्तांसाठी या वाहनांचा निश्चितच चांगल्या प्रकारे उपयोग होणार आहे. जिल्हा वार्षिक नियोजन योजनेतून पोलीस विभागासाठी नवीन वाहने खरेदी करण्यात आली आहेत. ही वाहने पोलीस विभागाला आज सुपूर्द करण्यात आली. पोलीस विभागामार्फत या वाहनांचा योग्य उपयोग करून पोलिसांमधील कार्यक्षमता व गतिमानता वाढण्यास मोलाची मदत होणार आहे.**

# रेड झोन वगळता राज्यात १ जूननंतर लॉकडाऊन शिथिल होणार : विजय वडेट्टीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात कोरोनाची रुग्णसंख्येमध्ये घट होत असल्याने आता १ जूननंतर लॉकडाऊन शिथिल करणार असल्याची माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. इतकंच नाहीतर राज्यात रेड झोन असलेल्या १४ जिल्ह्यांना वगळता इतर ठिकाणी नियम शिथिल करण्यात येणार आहेत.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याची माहिती समोर आल्यानंतर आता १ जूननंतर लॉकडाऊन हटवणार का ? असा प्रश्न वारंवार विचारला जात आहे. यावर विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वाचे संकेत दिले आहे. राज्यातील १४ जिल्ह्यांना रेड झोन म्हणू घोषित करण्यात आलं आहे.

या जिल्ह्यांमध्ये कडकडीत लॉकडाऊन असलं तरी करोनाच्या रुग्णांध्ये घट होताना दिसत नाही. त्यामुळे हे १४ जिल्हे वगळता इतर जिल्ह्यांमध्ये १ जूननंतर लॉकडाऊन शिथिल करण्यात येतील. अत्यावश्यक सेवा देणाऱ्यांसाठी सध्या लोकल सुरू असून अजून पुढचे १५ दिवस तरी नागरिकांना लोकलने प्रवास करता येणार नाही असं ते म्हणाले. करोनाचा धोका कमी होत असला तरी लोकल सुरू झाली तर मोठ्या प्रमाणात गर्दी वाढेल. त्यामुळे सध्या लोकल मर्यादित नागरिकांसाठीच असणार असल्याचं विजय वडेट्टीवार यांनी सांगितलं आहे.

## संक्षिप्त...

### मोटर सायकलच्या अपघातात एक ठार ; एक जखमी

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यातील निडी फाट्यावर दोन मोटर सायकलस्वरांचा समोरा समोर अपघात झाला अपघात येवढा भीषण होता की या अपघातातील एकाचा मृत्यू झाला आहे, तर दुसरा जखमी झाला,

रोहा नागोठणे मार्गावर निडि गावचे मारुती मंदिरा समोर रोहा कडून येणारी पल्सर मोटर सायकल एम एच ०६ बी एक्स १६०७ चालक प्रमोद रमेश यादव रा. किल्ला तालुका रोहा व नागोठणे मार्गावरून रोहा कडे येणारी पॉशन प्रो मोटरसायकल एम एच ०६ सी बी ९५९८ यावरील चालक भगवान बिरोबा शेळके रा. दमखाडी तालुका रोहा. ह्या दोन मोटार सायकलस्वरांच्यात समोरासमोर जोरदार धडक झाली

या अपघातात दोघे ही जखमी झाले, पुढील उपचारासाठी भगवान शेळके यांना हॉस्पिटल मध्ये घेऊन जात असताना त्यांचा मृत्यू झाला. एक जखमी आहे , या अपघातांची माहिती रोहा पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उपनिरीक्षक रविंद्र शेगडे अधिक तपास करीत आहेत.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**

पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.

संपर्क : ९८२०३५५३४६

## अहो आदितीताई रायगड जिल्ह्यासाठी विविध कामासाठी आपण करोडो रुपयाचा निधी आणलात

# पण गरिबांच्या शिवभोजनासाठी आपली उदासिनता का?

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्याच्या आपण पालकमंत्री आहात आणि पालकांचे कर्तव्य काय असते याची जाणीव देखील आपणांस आहे किंवा असावी. रायगड जिल्ह्यात गरिबांच्या रोजीरोटीचा प्रश्न सुटावा म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि अन्न नागरी पुरवठामंत्री ना.छगन भुजबळ यांनी महाराष्ट्राचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या निर्णयाप्रमाणे राज्यभर लॉकडाऊनच्या काळात शिवभोजन केंद्र सुरू करून एक वेळचा भोजनाचा प्रश्न सुटावा म्हणून प्रयत्न केले व त्याचा उदोउदो संपूर्ण भारत देशात झाला. पण केंद्र चालविणाऱ्या चालकांची बिले निधी अभावी ५ महिन्याचा कालावधी उलटून देखील मिळत नसल्यामुळे आपण रायगड जिल्ह्याच्या पालकत्व या नात्याने लक्ष घालावे व शासनाची ही योजना भविष्यात उज्वल ठरण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी रायगड जिल्ह्यातील शिवभोजन चालकांमधून केली जात आहे.






रायगड जिल्हा हा डोंगराळ भागात पसरलेला असून ही भूमी शिवरायांची पावनभूमी आहे. या पावनभूमीत शिवरायांनी कोणालाही उपाशी ठेवलेले नव्हते, असा इतिहास म्हणतो. परंतु कोरोनाच्या महामारीत केंद्राने व राज्याने लॉकडाऊन लावून गरिबांवर उपासमारीची पाळी आणली. याची झळ गरीबांना बसू नये म्हणून महाराष्ट्राचे व गरिबांचे कैवारी असलेल्या राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना गरिबांची जाणीव असल्यामुळे त्यांनी गरिबांच्या एकवेळ भोजनाची व्यवस्था व्हावी या हेतूने शिवभोजन केंद्र राज्यभर सुरू केली. त्यामुळे एकवेळचा पोटाचा आधार गरिबांचा सुटला. पण ही केंद्र चालविणाऱ्या चालकांना ५-५ महिने शासनाकडून दिलेला निधी मिळत नसल्यामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक केंद्र बंद होण्याच्या मार्गावर आहेत. याची दखल घेऊन शिवभोजन चालकांचा निधी मिळण्यासाठी आणि तो ही वेळेवर प्रति महिना मिळावा यासाठी आपण इतर कामासाठी जसा निधी उपलब्ध करता तसा का करू शकत नाहीत? तो करावा.

# रिक्षा पलटल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू ; दोन चिमुकले बचावले

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा-कोलाड मार्गावर प्रवासी ऑटो रिक्षा पलटी झाल्याने रिक्षातून प्रवास करणारे पती, पत्नी आणि दोन मुले प्रवास करीत होते, या दुर्दैवी घटनेत पती आणि पत्नी यांचा जागीच मृत्यू झाला तर त्यांच्या दोन चिमुकल्यांसह रिक्षा चालक बचावला असल्याची माहिती कोलाड पोलीसांनी दिली आहे.



रोहा-कोलाड मार्गावर रोहाकडून कोलाडकडे जाणारी रिक्षा चालक गणेश दगडू खाडे यांच्या रिक्षातुन अनंत मारुती कदम, त्यांची पत्नी व दोन मुले असा कुटूंब प्रवास करीत होते. संभे गावानजीक रिक्षा चालकाचा ताबा सुटल्याने डावेकडील खोल खड्ड्यात रिक्षा पलटी झाली. अपघातात अनंत मारुती कदम, मनीषा अनंत कदम (४७) रा. मजगाव, तालुका तळा यांना गंभीर दुखापत

..../२

# दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिलेच पाहिजे : राजेंद्र पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा वाद विकोपाला जात असताना सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून जोरदार आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे. येत्या १० जूनला मानवी साखळी उभारून भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त बांधावर राज्य सरकारला इशारा देणार असून जर सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही तर २४ जूनला प्रकल्पग्रस्त बांधव सिडकोच्या मुख्यालयाला घेराव टाकणार आहेत. या पार्श्वभूमीवर मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भाई राजेंद्र पाटील यांच्याशी चर्चा केली असता,ज्या दि.बा.पाटील यांच्या पुण्याईमुळे येथील भूमिपुत्र ऐशोआरामात जगत आहेत त्यांचे नाव विमानतळाला दिलेच पाहिजे अशी परखड भूमिका मांडली.



ते म्हणाले की हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव राज्यातील कुठल्याही प्रकल्पाला देता येऊ शकेल, परंतु माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांचेच नाव नवी मुंबई विमानतळाला देणे योग्य होईल. प्रकल्पग्रस्तांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी ज्या पद्धतीने दि बा पाटील यांनी आंदोलन उभारले ते महाराष्ट्रातले एकमेवाद्वितीय आंदोलन म्हणून गणले जाते. त्यांच्यामुळेच साडेबारा टक्के विकसित भूखंड परतावा हे तत्त्व प्रस्थापित झाले व पुढे जाऊन राज्याला आणि देशाला तसा कायदा मंजूर करावा लागला. आज आम्ही ग्रामपंचायत पंचायत समिती नगर परिषद महानगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून माजी खासदार लोकनेते दि बा पाटील साहेब यांचेच नाव विमानतळाला दिले गेले पाहिजे या स्वरूपाचे ठराव करून ते राज्य शासनाला पाठवत आहोत. वास्तविक ही जनभावना आहे आणि या जनभावनेचा राज्य सरकारने आदर केला पाहिजे. राजेंद्र पाटील पुढे म्हणाले की मी असा एकमेव कार्यकर्ता आहे ज्यानी स्वतःच्या घरात दि बा पाटील साहेब यांचा पुतळा लावलेला आहे.मी त्यांचा निस्सीम चाहता असून त्यांची प्रत्येक जयंती लोकाभिमुख कार्यक्रमांतून साजरी करत असतो.



**माताजी स्व. भागूबाई चांगू ठाकूर यांच्या आठव्या स्मृतिदिनामित्त त्यांचे सुपूत्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिवादन केले. तर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात स्व.भागूबाई चांगू ठाकूर यांना अभिवादन करताना आ.प्रशांत ठाकूर, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या शितला गावंड यांच्यासह कर्मचारी वृंदाने माताजींच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.**

# खाजगी रुग्णालयांनी म्युकरमायकोसीस रुग्णांची माहिती महानगरपालिकेला कळविणे बंधनकारक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी रुग्णालयांनी म्युकरमायकोसीस रुग्णांची माहिती महानगरपालिकेला कळविणे बंधनकारक असणार आहे.

गेले काही दिवसापासून कोविड-१९ आजारातून बरे झालेल्या रुग्णांना म्युकरमायकोसिस या काळ्या बुरशीजन्य रोगाचा धोका निर्माण झाला आहे. अशा रुग्णांसाठी आयुक्त आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय रायगड यांच्यामार्फत खाजगी रुग्णालयांतील

..../२

# न्याय, निकाल आणि समतोल

करोनाचे आक्रमण झाल्यापासून साऱ्या देशातील पीडितांनी, रुग्णांनी, संस्थांनी आणि संघटनांनी वारंवार न्यायसंस्थेकडे धाव घेतली आहे. गेल्या जवळपास दीड वर्षाच्या काळात देशातील केवळ उच्च न्यायालयांनीच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निकाल व आदेश दिले आहेत. विविध राज्य सरकारांना, नोकरशाहीला वारंवार धारेवर धरले आहे. यातल्या बहुसंख्य निर्णयांमध्ये करोनाचा संहार सोसणाऱ्या जनसामान्यांना दिलासा देण्याची दृष्टी होती, हे उघडच आहे भारतात गेल्या तीन दशकांमध्ये न्यायालयीन सक्रियता चांगलीच रुजली आहे आणि तिने अनेकवार विविध सरकारे आणि नोकरशाहीला अनेकदा ताळ्यावर आणले आहे. आपली जबाबदारी केवळ निकाल देऊन संपत नाही. जो काही न्याय असेल त्या न्यायाची तामिली झाली पाहिजे, हे न्यायालयीन सक्रियतेमागचे मूळ सूत्र आहे. सक्रियतेप्रमाणेच 'ज्युडिशियल ओव्हररीच' अशी संज्ञाही वारंवार वापरली जाते. तिचा अर्थ, नेहेमीच्या सीमा ओलांडून न्यायव्यवस्थेने व्यापक लक्ष घालणे. यातला तिसरा प्रकार 'ज्युडिशियल ॲडव्हेंचरिझम'चा आहे. हा न्यायालयीन साहसवाद अनेकदा आपल्या कामाच्या चतु:सीमा ओलांडून सगळ्याच व्यवस्थांना चाबूक दाखवतो. असे झाले की न्यायदानाच्या कार्याची व्याप्ती वाढवून विविध उपाययोजना, अनेक निर्बंध किंवा सोयीसुविधा यांची निर्मिती आणि त्यांचे प्रचालन यांच्यात न्यायालये लक्ष घालतात. इतकेच नाही तर, साऱ्या आदेशांच्या अंमलबजावणीवर निगराणी करण्याचे काम स्वत:कडे घेतात. गेल्या आठवड्यात मुंबई उच्च न्यायालयाने दहावीच्या परीक्षांबाबत राज्य सरकारला ज्या शब्दांत फटकारले आहे, त्याकडे या साऱ्या पार्श्वभूमीवर पाहायला हवे. राज्य सरकार दहावीची परीक्षा रद्द करून बसले आहे आणि मुंबई उच्च न्यायालयाचा कल पाहता या परीक्षा सरकारला घ्याव्या लागतील, असे दिसते. याचा अर्थ, लाखो विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, सगळी परीक्षा यंत्रणा या साऱ्यांना नव्या दमाने कामाला लागावे लागेल. 'परीक्षा रद्द करण्याचा आदेश तुम्ही मागे घेता की, तो आम्ही रद्द करू?' इतका स्पष्ट प्रश्न न्यायालयाने विचारला असल्याने पुढे काय होणार, ते दिसतेच आहे. खरेतर, गेले वर्षभर करोनाचे थैमान चालू आहे. अशावेळी दहावीच्या मुलांचे मूल्यांकन करण्याची पर्यायी शास्त्रीय पद्धती सरकारने तज्ज्ञांच्या मदतीने सज्ज ठेवायला हवी होती. तशी ती केली असती आणि न्यायालयाला सादर केली असती तर त्या मूल्यांकनाबद्दल विश्वासार्हता वाटू शकली असती. आधी परीक्षा रद्द आणि आता न्यायालयीन आग्रहामुळे त्या घ्याव्या लागणे, हा जो महागोंधळ होणार आहे, तो टाळता आला असता. गेल्या काही दिवसांत सर्वोच्च न्यायालयानेही प्राणवायूचा पुरवठा, लसीकरण, करोनाचे उपचार यासंबंधी वाढती सक्रियता दाखवली आहे. यामुळे केंद्र सरकारसहित अनेक यंत्रणांना नव्याने उत्तरदायी व्हावे लागते आहे. मात्र, यातून काही प्रश्नही निर्माण होत आहेत. उदाहरण द्यायचे तर सुप्रीम कोर्टाने अलीकडेच आपल्या अखत्यारीत करोना प्रकरणी कार्यगट नेमला. त्यात नामांकित डॉक्टर आहेत. या कार्यगटाने सुप्रीम कोर्टाला अहवाल देणे, अपेक्षित आहे. या कार्यगटाला देशभरातील आवश्यक ती माहिती शेवटी सरकारी यंत्रणेकडूनच घ्यावी लागणार आहे. याचा अर्थ, आधीच देशात अतिरेकी नोकरशाहीचा जो बुजबुजाट झाला आहे; त्यात अशा नेमणुकांनी भर पडते. मध्यंतरी, केरळ उच्च न्यायालयाने असेच निवडणूक आयोगाला अत्यंत कठोर शब्दांत फटकारले आणि नंतर त्याची दखल सुप्रीम कोर्टालाही घ्यावी लागली. अशा प्रकारची न्यायालयीन सक्रियता हे नोकरशाही किंवा निवडणूक आयोगासारख्या संस्थांच्या अकार्यक्षमतेमधून जन्म घेत असते. एका अर्थाने, जिथे नोकरशाही किंवा सरकार कमी पडते, तेथे न्यायालये स्वत: पुढे येतात. मात्र, देशातील न्यायालयांकडे आपले आदेश अमलात आणण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा किंवा नोकरशाही नसते. त्यांना अखेर राज्य किंवा केंद्र सरकारच्या अखत्यारीतली सुरक्षा दले, नोकरशाही किंवा अधिक व्यापक निकाल असतील तर कायदे मंडळे यांच्यावर अवलंबून राहायचे असते. अशावेळी, आपले सारे आदेश किंवा आदेशांनी निर्माण होणाऱ्या व्यवस्था या जमिनीवर शंभर टक्के अमलात आणण्याजोग्या आहेत किंवा नाहीत, याचाही अंदाज न्यायालयांनी घ्यायला हवा. सध्या देशात सगळ्यांच यंत्रणांवर कमालीचा ताण पडत आहे. मात्र, तरीही एकंदर सरकारी यंत्रणा किंवा नोकरशाहीवर समाजाचा बिलकुल विश्वास नसल्याने न्यायव्यवस्था हा एकमेव आणि अंतिम आधार आहे, असा समज बळावला आहे. तो खराही आहे. मात्र, न्यायालये न्यायदानाच्या पलीकडे पाऊल टाकून सक्रिय होतात तेव्हा एका बाजूला समाजाला दिलासा पण दुसरीकडे त्या आदेशांच्या अंमलबजावणीची व्यवहार्यता या दोन्ही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या असतात. सध्याच्या करोना काळात देशातील न्यायव्यवस्था हा महत्त्वपूर्ण समतोल साधेल, अशी अपेक्षा आहे.

# सिडको औद्योगिक विचारविनिमयाद्वारे पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करणार

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महाराष्ट्र शासनातर्फे ४४०-५७.९० हेक्टरच्या क्षेत्रात पालघर जिल्हा मुख्यालय आणि पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्याची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात आली आहे. नवी मुंबईसारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर विकसित केलेल्या सिडकोकडून मुंबईपासून ११० कि.मी. उत्तरेकडे व पालघर आणि बोईसर शहरांच्या मधोमध, ३७७ हेक्टरवर पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पातील १०३.५७ हेक्टर क्षेत्र हे जिल्हा मुख्यालयासाठी तर ३३७.० हेक्टर क्षेत्र हे पालघर नवीन शहरासाठी राखीव आहे. पालघर जिल्हा मुख्यालयामध्ये जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षकांचे कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हा व सत्र न्यायालय यांच्या इमारती, नवीन प्रशासकीय इमारती, प्रेक्षागृह, शासकीय विश्रामगृह, जिल्हा मुख्यालयातील किमान १०% कर्मचारी/अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने यांचा समावेश होतो. आतापर्यंत सिडकोकडून जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जिल्हा परिषद कार्यालयाच्या इमारतींचे नियोजन, संकल्पन आणि बांधकाम करण्यात आले आहे. सिडकोकडून आता उर्वरित ३७७ हेक्टरवर पालघर नवीन शहर विकसित करण्यास सुरुवात झाली आहे. परंतु सदर प्रकल्प विकसित करण्यापूर्वी सिडकोला बाजारातील प्रचलित कल, गुंतवणूकदारांचा विश्वास व त्यांच्या आवडीची क्षेत्रे, इच्छुक खरेदीदारांच्या आकांक्षा आणि प्रस्तावित नवीन शहर हे विकासाचे यशस्वी प्रतिमान (मॉडेल) बनवण्यासाठीच्या कल्पना जाणून घेणे व्यावहारिकदृष्ट्या आवश्यक वाटत आहे.

प्रस्तावित प्रकल्पाबाबत उद्योग जगताला माहिती देणे आणि औद्योगिक विचारविनिमयाद्वारे जमीन वापराचे प्राधान्य, आवश्यक क्षेत्र, विकासाचे प्रतिमान, भाडेपट्ट्याच्या अटी आणि विकास व विक्रयेता, अशा महत्त्वाच्या प्राचलांबाबत उद्योजकांच्या सूचना जाणून घेण्याचा सिडकोचा उद्देश आहे. म्हणून प्रकल्पाकरिता प्रभावी विकास धोरण आखण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांबरोबर मोलाचा विचारविनिमय करण्याकरिता स्वारस्य अभिव्यक्ती (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) प्रसिद्ध करण्यात आले आहे.

पालघर नवीन शहर हे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय/देशांतर्गत विमानतळापासून १५० कि.मी. अंतरावर आहे. सध्या डहाणू रोड, पालघर आणि पनवेल दरम्यान असणारी मेमू रेल्वे सेवा पालघर ते नवी मुंबई दरम्यानची संधानता (कनेक्टिव्हिटी) वाढवण्यासाठी उपयोगात आणण्याबाबत समन्वेषण करण्यात येईल. डहाणू येथे होऊ घातलेला वाढवण बंदर प्रकल्प हा पालघर नवीन शहरापासून तासाभराच्या अंतरावर असून या प्रकल्पामुळे या प्रदेशातील अर्थव्यवस्थेस मोठ्या प्रमाणावर चालना मिळणे अपेक्षित आहे. पश्चिम रेल्वे व राष्ट्रीय महामार्गाव्यतिरिक्त वाढवण बंदर, प्रस्तावित विरार-अलिबाग मल्टि मोडल कॉरिडॉरशी असलेल्या समीपतेमुळे पालघर नवीन शहर प्रकल्प मोठ्या प्रमाणावर सामाजिक व वाणिज्यिक विकास घडवून आणेल. तसेच या प्रकल्पामुळे इच्छुक गुंतवणूकदारांनाही मोक्याच्या ठिकाणी गुंतवणूक करण्याची संधी मिळणार आहे.

**सिडकोकडून पालघर नवीन शहर प्रकल्प विकसित करण्यास सुरुवात करण्यात आली असून प्रकल्प विकसित करण्यापूर्वी बाजाराच्या पैलूंचे सखोल आकलन करून घेण्याचा सिडकोचा उद्देश आहे. तसेच, आर्थिकदृष्ट्या वर्धनक्षम आणि विकासाच्या दृष्टीने शाश्वत ठरणारे नियोजन धोरण आखण्याबाबत, औद्योगिक क्षेत्रातील तज्ज्ञांकडून करण्यात येणाऱ्या मोलाच्या सूचनाही जाणून घेण्यात येतील.**

**डॉ. संजय मुखर्जी**
**उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जपली कायम सामाजिक बांधिलकी

# वाढदिवसानिमित्त जीवनावश्यक अन्नधान्याचे वाटप सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाला आजपासून (सोमवार, दि. २४) सुरुवात झाली.



भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत या वाटप कार्यक्रमाला विभागनिहाय सुरुवात झाली. राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गरजूंच्या मदतीसाठी कधीही राजकारण केले नाही. सदैव आपल्याकडून कशी मदत होईल याचाच त्यांनी विचार केला. त्यामुळे लोकांवर आलेले कोणतेही संकट असो ते आपले आहे असे मानून लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजाचे देणेदार लागतो या भावनेतून काम करीत आले आहेत. महापूर असो वा कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नेहमीच मदतीतून सर्वसामान्यांना आधार दिला आहे. कोरोना वैश्विक महामारीच्या काळात नागरिकांना तन-मन-धनाने मदत करत देवदूताप्रमाणे त्यांनी प्रामाणिक कार्य केले. त्यामुळे कोरोनाच्या आव्हानात्मक काळातही कोरोनावर मात करण्यासाठी मोलाची भूमिका बजाविणारे सेवाव्रती देवदूत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेले कार्य संस्मरणीय आणि अग्र स्थानावर राहिले आहे.

कोरोना महामारी मध्ये आपल्या दानतीचे व माणुसकीचे दर्शन देताना मागील वर्षात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी लाखो जणांना मदतीचा हात दिला. त्यांनी स्वखर्चातून दिड लाखाहून अधिक अन्नधान्याचे किट, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून अन्नछत्र, गावाला जाण्यासाठी मदत, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्वछता मोहिम, आर्थिक मदत, याखेरीज अर्सेनिक अल्बम गोळ्या, सॅनिटायझर, मास्कचे वाटप, गणपती सण गोड करण्यासाठी ६० हजार जणांना प्रसादासाठी अन्नधान्य, अशी हरएक आवश्यक मदत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या माध्यमातून झाली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कार्यक्रमे राबविले जातात. मात्र या वर्षीही कोरोना महामारीचे संकट आहे. त्यामुळे कोणतेही सार्वजनिक कार्यक्रमे होणार नसले तरी समाजोपयोगी उपक्रम सुरूच राहणार आहेत. त्या अनुषंगाने पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. यामध्ये गोडेतेल, चवळी, तुरडाळ, साखर, कांदे आणि बटाटी या रेशन साहित्याचा समावेश आहे. २३ मे पर्यंत ७२ हजार ८४७ रेशन किट तयार झाले असून त्याचे वाटप आजपासून सुरु झाले आहे.

# पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकांचे लोकार्पण संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते जिल्हा सामान्य रुग्णालयातील आरटीपीसीआर प्रयोगशाळा क्लाऊड मॅनेजमेंट प्रणालीचा आज येथे शुभारंभ करण्यात आला. तसेच यावेळी त्यांच्या हस्ते अद्ययावत सहा रुग्णवाहिकांचे लोकार्पणही संपन्न झाले.

याप्रसंगी खासदार सुनिल तटकरे, आमदार श्री.भरतशेठ गोगावले, आमदार श्री.महेंद्र दळवी, जिल्हा परिषद समाज कल्याण सभापती दिलीप भोईर, अलिबाग नगर परिषद बांधकाम सभापती अजय झुंजारराव, नगराध्यक्ष प्रशांत नाईक, जिल्हाधिकारी निधी चौधरी, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रमोद गवई, तहसिलदार सचिन शेजाळ, अधिसेविका जयश्री मोरे, जिल्हा रुग्णालयातील इतर वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आरटीपीसीआर प्रयोगशाळा क्लाऊड मॅनेजमेंटद्वारे क्लाऊड पॅथालॉजी या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून आरटीपीसीआर चाचणी झालेल्या व्यक्तीला त्याचा कोविड चाचणी अहवाल एसएमएस व डिजिटल लिंकद्वारे लवकर मिळू शकणार आहे. यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयातील नव्याने सुरु करण्यात आलेल्या कोविड सेंटर तसेच ऑक्सिजन प्लँटला भेट देवून तेथील वैद्यकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांशी चर्चा करीत सविस्तर कार्यपध्दती समजून घेतली, तसेच नागरिकांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचे निर्देश दिले.



# शिवसेनेकडून पेण उपजिल्हा रुग्णालयासाठी ऑक्सिजन मशीन भेट

**दै.रायगड नगरी । पेण**

कोरोनाच्या सक्रमनाने राज्यासह जिल्ह्यात मोठे संकट आले आहे. रुग्ण संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून पेण उपजिल्हा रुग्णालयासाठी ऑक्सिजन कॉन्सेन्टेटर भेट देऊन रुग्णांच्या हिताचे काम केले आहे.हे त्यांचे काम कौतुकास्पद असून याचा लाभ पेणच्या जनतेला निश्चितच होईल.या एका ऑक्सिजन कॉन्सेन्टेटर मशीनमध्ये ५ रुग्णांना लाभ मिळणार आहे. त्यामुळे पेणकरांना चांगली सुविधा मिळाली आहे. असे शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा प. स. सदस्य नरेश गावंड यांनी सांगितले.



शिवसेना जिल्हाप्रमुख तथा आमदार महेंद्र दळवी व शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा प. स. सदस्य नरेश गावंड तसेच शिवसेना पेण यांच्याकडून पेण उपजिल्हा रुग्णालयासाठी ऑक्सिजन कॉन्सेन्टेटर मशीन देण्यात आल्याने डॉ.सुरज म्हात्रे यांनी त्यांचे आभार मानले. यावेळी नरेश गावंड, पेण तहसीलदार अरुणा जाधव, डॉ. सूरज म्हात्रे, शुभांगी म्हात्रे, रमेश गिरके, सुधाकर म्हात्रे, बी. एच. पाटील, लवेंद्र मोकल, राजू पाटील, चेतन मोकल, राजेश पाटील, प्रसाद देशमुख, दिलीप पाटील, श्रीतेज कदम, तुकाराम म्हात्रे उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## रिक्षा पलटल्याने पती-पत्नीचा जागीच मृत्यू ; दोन चिमुकले बचावले

झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला तर अभिजीत अनंत कदम (९) व अक्षरा अनंत कदम (५) हे दोन चिमुकले व रिक्षा चालक हे या अपघातातून बचावले आहेत. सदर कुटुंब वाशीगाव नवी मुंबई येथे राहत होते. अपघाताची माहिती मिळताच कोलाड सहायक पोलीस निरीक्षक सुभाष जाधव हे आपल्या सहकाऱ्यांसमावेत घटनास्थळी दाखल झाले. या अपघाताचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शखाली पोना पी. जी. पाटील व पोहवा ए. आर. म्हात्रे करीत आहेत.

## म्युकरमायकोसीस रुग्णांची माहिती महानगरपालिकेला कळविणे बंधनकारक

म्युकरमायकोसीसच्या रुग्णांना आवश्यक असणारे 'म्फोटेरीसीन बी' इंजेक्शन उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे उपलब्ध करून देण्यात आले आहे.

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व खाजगी रूग्णालयांनी रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या किंवा उपचार घेणाऱ्या म्युकरमायकोसिस रुग्णांबाबतची सर्व माहिती पनवेल महानगरपालिकेला कळविणे बंधनकारक आहे. खाजगी रुग्णालयांनी ही माहिती covid19panvelgmail.com या इमेलआयडीवरती पाठवावी अशा सूचना महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाने दिल्या आहेत. सध्या महानगरपालिका हद्दीमध्ये म्युकरमायकोसिसचे दोन रुग्ण असून एक रुग्ण मेडेसिटी रुग्णालय, एक रुग्ण एमजीएम रुग्णालय येथे उपचार घेत आहे.


### नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव देण्यासाठी

# ५००० वकिलांची फौज घेऊन आंदोलनात उतरणार : ॲड.मनोज भुजबळ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई विमानतळाच्या नामांतराचा वाद विकोपाला जात असताना सर्वपक्षीय कृती समितीच्या माध्यमातून जोरदार आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे. येत्या १० जूनला मानवी साखळी उभारून भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त बांधव राज्य सरकारला इशारा देणार असून जर सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही तर २४ जूनला प्रकल्पग्रस्त बांधव सिडकोच्या मुख्यालयाला घेराव टाकणार आहेत. या पार्श्वभूमीवर आमच्या प्रतिनिधीने पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक ॲड मनोज भुजबळ यांच्याशी चर्चा केली असता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय दर्जाच्या विमानतळाला लोकनेते दि बा पाटील यांचेच नाव दिले पाहिजे अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली आणि हे नाव देण्यासाठी आम्ही पराकोटीचे प्रयत्न करणार असल्याचे सूतोवाच केले.

आपल्या भूमिकेचे विश्लेषण करत असता मनोज भुजबळ म्हणाले की आज एक नगर-सेवक म्हणून, लोकप्रतिनिधी म्हणून किंवा एक वकील अथवा वकीलांच्या संघटनेचा अध्यक्ष म्हणून मी माझी भूमिका मांडत नाही तर एक त्रयस्थ,एक सामान्य नागरिक म्हणून मला असे वाटते की नवी मुंबई विमानतळाला माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांचेच नाव देणे संयुक्तिक होईल. हिंदुहृदयसम्राट हे एक असामान्य व्यक्तिमत्व आहे. त्यांची संपूर्ण हयात त्यांनी मराठी माणसासाठी, हिंदुत्वासाठी संघर्ष उभारण्यात, झटण्यात घालविले आहे. परंतु तरी सुद्धा नवी मुंबई विमानतळाला त्यांचे नाव देणे संयुक्तिक होणार नाही कारण आज तब्बल चारशे कोटी रुपये खर्च करून मुंबईमध्ये त्यांचे भव्यदिव्य असे स्मारक उभारले जात आहे. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे की आजपर्यंत आमचे माजी खासदार लोकनेते दि बा पाटील यांचे अशाप्रकारे स्मारक उभारण्यासाठी कुठलेही प्रयत्न झाले नाहीत. दि बा पाटील यांनी कामगारांसाठी शेतकऱ्यांसाठी निस्पृह पणाने कार्य करत आंदोलने उभारली, त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून दिले.त्यामुळ नवी मुंबई वमानतळासाठी दि बा पाटील यांचेच नाव देणे उचित होईल.



भुजबळ पुढे म्हणाले की, मी माझ्या लहानपणा-पासून पाटील यांचे कार्य पाहत आलो आहे. निस्वार्थी पणाने झोकून देऊन कार्य करणारे नेते असाच त्यांचा मी उल्लेख करेन. त्यांनी स्वतःच्या उदरनिर्वाहाचा विचार न करता, स्वतःसाठी कुठलाही उत्पन्न स्त्रोत निर्माण न करता निस्सीम पणाने जनतेची सेवा करत राहिले. त्यांनी मनात आणले असते तर हजारो कोटी रुपयांची माया ते सहज जमू शकले असते. परंतु त्यांची राहणी अत्यंत साधी होती किंबहुना त्यांचे राहते घर आणि त्यांची गाडी यासाठी कार्यकर्त्यांनी लोकवर्गणीतून तजवीज केली होती. सर्वसामान्यांचे नेतृत्व असणाऱ्या अशा सन्माननीय नेत्यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला दिले गेलेच पाहिजे. सत्तरच्या दशकामध्ये सिडको आस्थापनाने भूमिपुत्रांच्या जमिनी संपादित केल्यानंतर अत्यंत तुटपुंजा मोबदला देण्याचे योजिले होते. थोड्याफार आंदोलनातून अत्यल्प मोबदला वाढविला देखील होता. परंतु लोकनेते दी बा पाटील यांच्या अभ्यासू आणि आक्रमक आंदोलनामुळे आज गावठाण विस्तार योजना अस्तित्वात आली आहे. साडेबारा टक्के विकसित भूखंड परतावा योजनेचे तत्त्व प्रस्थापित झाले आहे. पुढे जाऊन याच योजनेचे कायद्यात रूपांतर झाल्याने त्याचा राज्यातील आणि देशातील शेतकऱ्यांना फायदा होत आहे. नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी नामांतराचा हा वाद निर्माण करण्याची गरजच नव्हती. कुठेतरी पक्षीय राजकारणाच्या माध्यमातून कुरापत काढण्याचे काम या निर्णयाच्या पाठी आहे असे वाटते. रायगड नवी मुंबई कोकण किनारपट्टी सह संपूर्ण महाराष्ट्रातून लोकनेते दि बा पाटील यांच्या नावाला दुजोरा दिला जात आहे. दी बा पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याच्या आंदोलनात आम्ही आमच्या संघटनेच्या माध्यमातून रायगड, ठाणे शहर, ठाणे ग्रामीण पालघर, नवी मुंबई अशा विविध ठिकाणचे ५००० वकिलांची फौज आंदोलनात उतरवणार आहोत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पतीने केली पत्नीची हत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेवणाच्या किरकोळ कारणावरुन पतीने त्याच्या पत्नीचा गळा दाबून मारहाण करून तीला जीवे ठार मारल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर ११ येथील पाईपलाईन झोपडपट्टी येथे राहणाऱ्या राजू राठोड (२८) याचा वाद त्याची पत्नी भुशी राठोड (२३) हिच्या बरोबर जेवणाच्या किरकोळ कारणावरुन झाला. यावेळी त्याने रागाच्या भरात त्याच्या पत्नीचा गळा दाबून मारहाण करून तीला जीवे ठार मारले. याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि शत्रुघ्न माळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जगताप, म.पो.सई गायकवाड आदींच्या पथकाने सदर आरोपीला ताब्यात घेतले आहे.

## वृद्धाची केली लुट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका वृद्ध इसमास मारहाण करून त्यांच्या अंगावरील दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास १ लाख २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना नवीन पनवेल परिसरात घडली आहे.

नवीन पनवेल सेक्टर १३ येथे राहणारे त्रंबक दहातोंडे (८५) यांचे दुमजली घर असून वर त्यांचे कुटुंबिय राहतात. तर त्यांच्या खालील बाजूस असलेल्या एका गाळ्यामध्ये ते स्वतः झोपतात. अज्ञात दोघा चोरट्याने मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्या गाळ्यात घुसून त्यांना मारहाण करून त्यांच्याकडील दागिने व रोख रक्कम असा मिळून जवळपास १ लाख २० हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सुधागड तालुक्यात ३ कोरोना बाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात सोमवारी (ता.२४) ३ कोरोना बाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर १४ जण बरे झाले आहेत.

सध्या तालुक्यात कोरोनाचे १०५ सक्रिय रुग्ण आहेत अशी माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे १०८२ रुग्ण झाले असून ९२७ रुग्ण बरे झाले आहेत. आणि तब्बल ५० रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

# पोलादपूरमधील पादचारीपथ पुर्ण करा : खा.सुनील तटकरे यांनी दिले निर्देश

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहरातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील अंडरपास रस्त्यामुळे सर्व्हीस रोडला पादचारीपथ पुरेसा रूंद उभारण्याची गरज असून यंदा तुळशीखिंड व आंबेत म्हाप्रळ पुल वाहतूकीस बंद असल्याने मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटातील भूस्खलनामुळे कोकणाचे दळणवळण बंद होऊ शकत असल्याने तातडीची तसेच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेऊन अभियंते व प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश रायगड लोकसभा मतदार संघाचे खा.सुनील तटकरे यांनी दिले.



पोलादपूर शहरातील अंडरपास रस्ता आणि कशेडी घाटातील डोंगर उभे कापल्याने मोठ्याप्रमाणात अनैसर्गिक भूस्खलन होण्याची शक्यता यंदाच्या पावसाळ्यामध्ये निर्माण झाल्याच्या ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्या वृत्तपत्रांतील तसेच विविध माध्यमांतील बातम्यांची दखल घेत रायगड लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे यांनी शनिवारी पोलादपूर शहर व कशेडी घाटाचा पाहणी दौरा आयोजित केला.

यावेळी पोलादपूर येथील छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याजवळ खा.तटकरे यांच्यासमवेत राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाचे अभियंता बांगर, महाड उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी प्रतिमा पुदलवाड, महाड येथील राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाच्या डीव्हीजनल इंजिनियर आकांक्षा मेश्राम, 'एलअॅण्डटी'कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू, तहसिलदार दिप्ती देसाई, माजी पं.स.सभापती दिलीप भागवत, राष्ट्रवादी सेवादलाचे जिल्हाध्यक्ष वाय.सी.जाधव, शहरअध्यक्ष अजित खेडेकर, सुहास मोरे, अनिलकुमार भोसले, नितीन म. शेठ आणि अन्य अधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी पत्रकार पालकर यांनी, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील ग्रामीण रूग्णालयापर्यंत सर्व्हीस रोडची पूर्तता पावसाळ्यापूर्वी होण्याची गरज असून पादचारीपथांची रूंदीदेखील एकाचवेळी येणाऱ्या-जाणाऱ्या पादचाऱ्यांना सोयीचे होईल, अशी असावी, कधीही राष्ट्रीय महामार्ग पोलादपूरमध्ये अरूंद असावा, अशी मागणी करताना वाढते शहर व नगरपंचायत असल्याने केली नसताना ६० मीटर्सऐवजी ४५ मीटर्स भूसंपादन करण्यात आले आहे, असे कशामुळे झाले, असा सवाल यावेळी केला. यावेळी अभियंता बांगर यांनी कोणीतरी भुपृष्ठ वाहतूकमंत्री गडकरी यांच्याकडे निवेदन दिल्याने ४५ मीटर्स भूसंपादनामध्ये सर्व्हीसरोड आणि तीनपदरी अंडरपास रोड होण्याचा प्लॅन करावा लागला असल्याचे सांगितले. यावेळी खा.तटकरे यांनी पोलादपूरकरांनी सर्व्हीस रोडसाठी सहकार्य करावे तसेच प्रशासनाने महामार्गासाठी संपादित केलेल्या जमिनींचा ताबा तातडीने घेऊन काम सुरू करण्याचे निर्देश दिले. यावेळी अभियंता बांगर यांनी, छ.शिवाजी महाराजांचा पुतळा वाचविण्यासाठी अंडरपासजवळ काँक्रीटची पुर्ण आकाराची मजबूत संरक्षकभिंत भूमिगत खंदकामध्ये उभारण्याचे काम सुरू केले असल्याचे यावेळी सांगितले. यावेळी मनसे कार्यकर्ते ओंकार मोहिरे आणि प्रवीण पांडे यांनी पोलादपूर शहरातील गरजू वृध्द महिला बेबी आप्पा सुतार यांच्यासाठी घरकुल मंजूरीसाठी निवेदन दिले. यावेळी खा.तटकरे यांनी प्रशासक तथा प्रांताधिकारी प्रतिमा पुदलवाड यांना निवेदनावर घरकुल मंजूरीचे लेखी निर्देश दिले. यावेळी नितीन म.शेठ यांनी पोलादपूर पोलीस ठाणे आणि पोलादपूर तहसिलदार यांना नवीन वाहन मिळण्याची मागणी केली.

यानंतर खा.सुनील तटकरे यांना पत्रकार पालकर यांनी पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटातील धामणदिवीपासून भोगाव फाट्यापर्यंतच्या रस्त्यालगतचा डोंगर उभा कापण्यात आल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात भूस्खलन होण्याची शक्यता लक्षात घेता मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग ठप्प होणार आहे. त्यामुळे आवश्यक तेवढे भूसंपादन करण्यात येऊन डोंगरातील भूस्खलन महामार्गापर्यंत दरडी पोहोचणार एवढ्या अंतरापर्यंत असावे, असे सुचविले असता अभियंता बांगर यांनी या डोंगरातील जमिनीच्या भूसंपादनाचा प्रस्ताव केंद्रसरकारकडे दिला असल्याचे सांगितले. यावेळी भूसंपादन अधिकारी तथा महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांनी सदरचा प्रस्ताव आपणास प्राप्त झाल्यास पाठपुरावा करू, अशी ग्वाही दिली. डोंगराच्या तळाशी संरक्षक भिंत उभारण्यात आल्याचा पर्याय कुचकामी असून भूस्खलन याभिंतीवरून होत असल्याने वाहतुकीला धोका निर्माण होत असल्याचे अपघातांवेळी दिसून आल्याचे यावेळी पत्रकार पालकर यांनी सांगितले. यावेळी खा.सुनील तटकरे यांनी कशेडी घाटातील भूस्खलन दरवर्षीप्रमाणे यंदाही झाले तर कोकणात जाण्याचे सर्व मार्ग बंद होणार असल्याने यंदा कोणत्याही परिस्थितीत कशेडी घाटामध्ये भूस्खलन होऊ नये यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे निर्देश यावेळी दिले.

यानंतर महाड उपविभागीय अधिकारी प्रतिमा पुदलवाड यांच्या मार्गदर्शनाखाली धामणदिवी येथील गेल्यावर्षी दरड कोसळलेल्या ठिकाणी अभियंता बांगर,डीव्हीजनल इंजिनियर आकांक्षा मेश्राम, 'एलअॅण्डटी'कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर जगमोहन नायडू, तहसिलदार दिप्ती देसाई यांनी पाहणी करून तेथील लोकवस्तीचे स्थलांतरण व भुसंपादन करण्यासंदर्भातील शक्यतांबाबत पडताळणी केली.

## कोपरी नाल्यावरती नव्याने करण्यात आलेल्या सिमेंट काँक्रिट रस्त्याच्या कडेला पथदिवे लावण्याची आवश्यकता

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन शहरातील पेशवे आळी ते बाजारपेठ यांना जोडणारा कोपरी नाला रस्ता आता सिमेंट काँक्रीटीकरण करुन नव्याने बांधण्यात आला आहे. शहरातील टिळक मार्ग, गणेश आळी त्याचप्रमाणे पेशवे आळी या ठिकाणचे पावसाचे पाणी या नाल्यातून वाहून जाऊन बाजारपेठेतील दादर पुलाच्या खालून जाऊन खाडीला मिळत असे. पावसाळा संपल्यानंतर हा नाला पूर्णपणे कोरडा होत असे. त्यावेळी काही पादचारी व सायकलस्वार या रस्त्याचा वापर बाजारपेठेत जाण्यासाठी करत असत. परंतु यावर्षी श्रीवर्धन नगरपरिषदेने सदर नाला थोडा खोल करून आता त्याच्यावरती सिमेंट काँक्रीट टाकून रस्ता तयार केला आहे.

पावसाचे पाणी या रस्त्याच्या खालून जाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच या रस्त्यावरती अनेक ठिकाणी नाला साफ करण्यासाठी खाली उतरण्यास ढापे देखील ठेवण्यात आले आहेत. शहरातील आगर पट्ट्यातील नागरिकांना बाजारात जाण्यासाठी हा अत्यंत जवळचा रस्ता तयार झाला आहे. रस्ता तयार होऊन त्याचे अधिकृत उद्घाटन देखील झाले. परंतु या रस्त्याला पथदिवे बसवण्याची आवश्याकता अद्याप तरी नगरपालिकेला भासलेली नाही. रात्रीच्या वेळी हा रस्ता पूर्णपणे अंधारमय असतो. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने या नवीन झालेल्या रस्त्याच्या कडेला पथदिवे बसवावेत अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## घडाळ्याच्या दुकानासह फुड मॅजिक दुकानात घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद घडाळ्याच्या दुकानासह फुड मॅजिक दुकानात अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत मोठ्या प्रमाणात विविध कंपनीचे घड्याळे व रोख ररक्म असा ऐवज चोरुन नेल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर २१ प्रथम हेरीटेज शॉप नं.१७ या ठिकाणी आर्ट वॉच या नावाचे दुकान नौशाद यांचे असून सदर दुकान बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने शटरच्या कुलूपाचा कोयंडा कोणत्यातरी हत्याराने तोडून शटर उघडून आत प्रवेश केला व शोरुममधील विविध नामांकित कंपन्यांची घड्याळे, रोख रक्कम तसेच शेजारील फुड मॅजिक दुकानातील रोख रक्कम असा मिळून जवळपास २६ हजाराचा ऐवज चोरुन नेला आहे.

याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## वाढत्या महागाई विरोधात राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे म्हसळ्यात निदर्शने

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

देशात प्रचंड इंधनाच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पेट्रोलचे दर शंभरीवर गेले आहेत. यामुळे मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे. त्यातच केंद्र सरकारने खतांचे दर वाढवत शेतकऱ्यांना मोठा धक्का दिला आहे. या विरोधात म्हसळा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सोमवारी (दि. २४ मे) दिघी नाका ते तहसील कार्यालय पर्यंत केंद्र सरकारच्या विरोधात घोषणा देत मोर्चा काढण्यात आला.




त्यांनतर तहसीलदार शरद गोसावी यांना निवेदन देण्यात आले.अगोदरच इंधनाची भरमसाठ दरवाढ करण्यात आली आहे. वाढत्या महागाईच्या ओझ्याखाली सामान्य माणूस भरडला जात असताना खतांची दरवाढ झाल्याने महागाईत आणखी भर पडणार आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मोदी व केंद्र सरकार विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. यामुळे तहसीलदार कार्यालयाचा परिसर दणाणला होता. गुजरात राज्याला वादळ नंतर १००० कोटींची मदत जाहीर केली पण महाराष्ट्राच्या जनतेच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे आम्ही केंद सरकारचा जाहीर निषेध करीत आहोत.

तसेच भाववाढ कमी न झाल्यास जन आंदोलन करणार असल्याचे तालुका अध्यक्ष समीर बनकर यांनी यावेळी सांगितले. मोर्चा प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य सभापती बबन मनवे, सभापती छाया म्हात्रे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष समीर बनकर, उपसभापती संदीप चाचले, म्हसळा तालुका महिला अध्यक्ष रेश्मा काणसे, शहराध्यक्ष शगुप्ता जहांगीर, शाहिद उकये, वरवटने गण अध्यक्ष सतीश शिगवण,किरण पालांडे, गजानन पाखड, मंगेश म्हशीलकर, सरोज म्हशीलकर, संजय कर्णिक, चंद्रकांत कापरे, रमेश खोत, नाना सावंत आणी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## खारघर सेक्टर-३५ मधील रस्ते चिखलमय ; नागरिक संतप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महानगर गॅस वाहिनी टाकण्यासाठी केलेल्या खोदकामुळे खारघर सेक्टर-३५ मधील रस्ते चिखलमय झाल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे.



खारघर सेक्टर -३४, ३५ मधील रस्ते खष्मय झाल्यामुळे येथील रहिवाशांनी खारघर येथील सिडको कार्यालयात आंदोलन केल्यावर पाच वर्षांनंतर रस्त्याचे डांबरीकरण झाले. त्यात खारघर परिसरात घरोघरी गॅस जोडणीसाठी रस्ते खोदकाम करुन गॅसवाहिनी टाकण्याचे काम सुरु आहे. सदर काम १५ मे पूर्वी करुन रस्ते दुरुस्ती करणे आवश्यक होते. मात्र, गॅसवाहिनी टाकण्याचे काम झाल्यावर रस्ते दुरुस्ती न करता 'रस्ते जैसे थे' ठेवण्यात आल्याने रस्ते चिखलमय झाले असून, नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

खारघर सेक्टर -३४, ३५ परिसरातील रस्ते खड्डेमय झाले होते. त्या विरोधात खारघर सेक्टर -३४, ३५ मधील नागरिकांनी खारघर येथील सिडको कार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयात धरणे आंदोलने केल्यावर पाच वर्षानंतर रस्त्याचे डांबरीकरण झाले. गॅस जोडणी घरोघरी करणे महत्वाचे काम आहे. मात्र, सदर काम १५ मे पूर्वी रस्त्याचे काम पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु, त्याकडे सिडको अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

येत्या ३१ मे पर्यंत खारघर सेक्टर -३४, ३५ मधील रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण न झाल्यास खारघर येथील सिडको कार्यालयात नागरिकांच्या वतीने आंदोलन केले जाणार आहे, असे खारघर सेक्टर -३४, ३५ मधील नागरिकांनी सांगितले. दरम्यान, १६ मे नंतर अचानक वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. त्यामुळे खारघर सेक्टर -३४, ३५ मधील रस्ते दुरुस्तीचे काम झाले नाही. मात्र, ३१ मे पर्यंत रस्ते दुरुस्तीचे काम पूर्ण केले जाणार आहे, असे खारघर येथील सिडको कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले. खारघर सेक्टर-३५ वसाहतीच्या मध्यभागी असलेल्या नाल्यात परिसरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात डेब्रिज टाकले जात आहे. 'सिडको'ने नाल्यात डेब्रिज टाकणाऱ्या व्यक्तींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी खारघर सेक्टर-३५ मधील रहिवाशांकडून केली जात आहे.

## श्रीवर्धन तालुक्यात १७ कोरोना पॉझिटीव्ह तर एकाचा मृत्यु

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये आता कोरोना प्रादुर्भाव वाढत असून, दर दिवसाला रुग्ण संख्येत वाढ होत असताना दिसत आहे. रविवार २३ मे रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवाल नुसार तालुक्यात १७ रुग्णांची वाढ झाली आहे. तर एक रुग्णाचा मुत्यु झाला आहे. त्यामुळे एकीकडे शासनाकडून लॉकडाऊनचे निर्बंध शिथील होत असताना ग्रामीण भागातील रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने चिंता वाढली आहे.

मागील एप्रिल महिन्यात कोरोना चाचणी अहवालानुसार तालुक्यात १९३ रुग्ण सापडले. या महिन्यातील २३ मे पर्यंत २१४ रुग्णाची संख्या समोर येत आहे. एकुणच रुग्ण संख्येत वाढ होत असल्याने चिंताजनक चित्र तालुक्यात आहे. काही काळ कमी झालेल्या कोरोना संसर्गाने पुन्हा उसळी घेतली आहे. तालुक्यात अनेक गावांतून कोरोना संसर्गाचा फैलाव होत आहे.

यामध्ये दिवेआगर ७, श्रीवर्धन शहर परिसरातील २, बागमांडला २, राणवली २, सर्वे २, कोलमांडला, मेटकर्णी येथील प्रत्येकी १ रुग्णांचा रिपोर्ट पॉजेटीव्ह आला आहे. तालुक्यातील ता. २३ मे रोजी मिळालेल्या कोरोना चाचणी अहवालानुसार १७ रुग्ण संख्या वाढली असून एक रुग्णाचा मुत्यु झाला आहे. आता बाधित रुग्णांची एकूण संख्या ९०० झाली आहे. यातील ३९ रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह होऊन दगावले आहेत. तर ७२४ रुग्ण कोरोनावर मात करुन बरे झाले आहेत. सद्या १३७ रुग्ण उपचार घेत आहेत.

या महिन्यामध्ये कोरोना बाधित रुग्णांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. दुसऱ्या लाटेतील कोरोना विषाणू चा संसर्ग ग्रामीण भागात वाढताना दिसून येत आहे.

**इमारत पुर्नबांधणी/विकासाकरिता**
**जाहीर निविदा सूचना**

रफाई पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सी.टी.एस. नं.१५८७ आणि १५८८-ए/१ ही संस्था, तक्का-पनवेल, जि.रायगड येथे आहे.

या संस्थेची नोंदणी क्र.आरजीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी (टीसी) २५३५/२०१२-२०१३ सन २०१२ दि.१७/०५/२०१२ हा आहे.

सोसायटी आपल्या प्लॉटवर असलेल्या इमारतीच्या जागी पुर्नबांधणी/विकास करू इच्छित आहे. प्लॉटचे क्षेत्र ४२२.५ चौ.मीटर आहे. त्याकरिता इच्छुक बांधकामदार/विकासकांनी आपल्या स्पर्धात्मक निविदा पुढील वेळेनुसार सादर काव्यात.

**निविदा मुल्य : रु.५००/- (पाचशे मात्र)**
**निविदा मिळण्याचे तारीख : ८ ते १३ जून २०२१**
**वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत**
**निविदा सादर करण्याची अंतिम तारीख : १५ जून २०२१**
**वेळ : सायंकाळी ६ वाजेपर्यंत**
**निविदा उघडण्याची तारीख : १९ जून २०२१ सायंकाळी ४ वाजेपर्यंत**

**निविदा मिळण्याचे ठिकाण :**

**श्री.संतोष टाक्कर** — **सचिव**

**सौ.रेखा बहिरा**
**१०७, बाबाजी लॅन्डमार्क,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**अध्यक्ष**

**रफाई पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, तक्का-पनवेल**

## १६ वर्षीय मुलीवर बलात्कार, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील एका गावामध्ये हळदीसाठी गेलेल्या सोळा वर्षीय मुलीवर दोघांनी बलात्कार केल्याची घटना घडली आहे. तालुका पोलिस ठाण्यात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तर दुसरा आरोपी फरार आहे.

१६ वर्षीय मुलगी हळदीसाठी एका गावात गेली होती. त्यावेळी आरोपी तुकाराम पारधी आणि अनिल भगत यांनी तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. याची माहिती तरुणीने नातेवाईकांना दिल्यानंतर आरोपींविरोधात पनवेल तालुका पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. यातील आरोपी अनिल भगत याला जंगलात जाऊन पोलिसांनी अटक केली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक/भोगवटादार श्री.आत्माराम भिवा खाने, श्रीमती.मंजुळाबाई देहू दिसले, श्री.महेंद्र हरिश्चंद्र खाने, श्रीमती. राजेश्री हरिश्चंद्र खाने, श्रीमती.प्रमिला कृष्णा जुमारे, श्रीमती.अर्चना हरिश्चंद्र खाने, श्री.महेश हरिश्चंद्र खाने, श्री.मधुकर परशुराम पाटील, श्री.चंद्रकांत परशुराम पाटील व श्रीमती.इंदुबाई अनंता ठोंबरे, रा.चिंचवली तर्फे तळोजे, ता.पनवेल यांच्या नावे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहत. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे : चिंचवली तर्फे तळोजे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकत**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | ५४ | - | ०-२८-००<br>पो.खराबा ०-०२-००<br>०-३०-०० संपूर्ण क्षेत्र | ०=२२ |
| २) | ५६ | - | २-६६-४०<br>पो.खराबा ०-१०-६०<br>२-७७-०० पैकी<br>०-३०-०० इतके क्षेत्र | २१=३१ |

सबब या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, वर उल्लेख केलेल्या जमीन मिळकती संदर्भात कोणीही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, भाडेपट्टा, खरेदी-विक्रीचा व्यवहार, साठेकरार, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, लीज, ताबा हक्क, पोटगी, कुलमुखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्यांच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक/भोगवटादार यांचेबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/०५/२०२१

**सही/-**
**अॅड.एच.ए.भगत**
**वकील : मुंबई हायकोर्ट**
**मोबाईल नं.८०८०२०२२७२**
**सुशिल प्राईड, २०१-२०२, दुसरा मजला,**
**गार्डन हॉटेल बस स्टॉप जवळ, ता.पनवेल, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## बेकायदेशीर मद्यविक्री; खारघरमध्ये हॉटेलवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे मद्यविक्री करण्यास बंदी असताना देखील छुप्या पध्द–तीने मद्यविक्री करुन नियमभंग करणाऱ्या खारघर मधील पापडीचा पाडा येथील साई एकविरा हॉटेलवर गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने छापा मारुन हजारो रुपये किंमतीचा मद्याचा साठा जप्त केला आहे. तसेच बेकायदेशीररित्या मद्य विक्री केल्याप्रकरणी सदर हॉटेल चालकावर गुन्हा दाखल करुन त्याला ताब्यात घेतले आहे. कोरोना विषाणुंचे संक्रमण रोखण्यासाठी राज्य शासनाने लॉकडाऊन घोषित केला आहे. त्यामुळे अत्यावश्यक सेवा वगळता बार, पब्स, वाईन शॉप आणि इतर दुकाने बंद करण्याचे सक्त आदेश देण्यात आले आहेत. मात्र, त्यानंतर देखील खारघर मधील पापडीचा पाडा येथील साई एकविरा हॉटेल मधून बेकायदेशीररित्या देशीविदेशी मद्याची विक्री करण्यात येत असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाला मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखेच्या पथकाने सदर हॉटेलवर छापा मारला असता, हॉटेलमध्ये देशी–विदेशी दारुचा साठा विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले. त्यामुळे गुन्हे शाखेने सदर हॉटेलमधून सुमारे ५५ हजार रुपये किंमतीचा देशी–विदेशी मद्याचा साठा जप्त केला. त्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने सदर हॉटेलचा चालका विरोधात खारघर पोलीस ठाण्यात बेकायदेशीरीत्या दारुची विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

## शिवसेना कामोठे शहरच्यावतीने मोफत सॅनिटायझर फवारणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८०% समाजकारण आणि २०%राजकारण या सुत्रास अनुसरुन सामाजिक बांधिलकीतुन शिवसेना कामोठे शहरच्यावतीने वसाहतीमध्ये मोफत सॅनिटायझर फवारणी करण्यात आली.

शिवसेना कामोठे शहरच्या माध्यमातून शिवसेना कामोठे शहरप्रमुख राकेश रोहिदास गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्र–११ मधील सर्व सेक्टर ५, ६, ६अ, ८, ९, २१, २२, २४, २५ मध्ये सर्व बिल्डिंगमध्ये आणि आजूबाजूच्या परिसरात कारोनाच्या महामारी पासून सुरक्षा होण्यासाठी मोफत सॅनिटाईज होणार आहे सेक्टर ८ मध्ये मोफत सॅनिटाईज करून देण्यात आली आहे. व अजूनही कामोठे मध्ये प्रभाग ११ मध्ये सॅनिटाईज मोफत फवारणी उपक्रम चालूच राहणार आहे. कोरोना विषाणु ची दुसरी लाट हि भीषण संक्रमणाची असुन अतिशय घातक आहे. प्रभाग ११ ठिकाणी औषध फवारणी करण्याचे काम वेगाने चालू आहे. घाबरू नका. हि लढाई शस्त्र रूपी नसुन. माणुसकी रूपी आहे. मास्क वापरा, वारंवार हात धुवा, एकमेकांमध्ये अंतर ठेवून ऊभे रहा. कामोठे शहर सोसायटी मधील सर्व सभासद व नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन कामोठे शिवसेना शहर शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

### श्रीबाग येथे अलिबाग नगरपरिषदेतर्फे उभारण्यात येणाऱ्या

# स्व. नमिता प्रशांत नाईक क्रीडा संकुलच्या कामाला पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दिली भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

येथील श्रीबाग येथे अलिबाग नगरपरिषदेतर्फे उभारण्यात येणाऱ्या स्व. नमिता प्रशांत नाईक क्रीडा संकुलच्या कामाला पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज भेट दिली. या कामाची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले.

हे काम आता अंतिम टप्प्यात असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करू देण्याबाबत नगराध्यक्ष प्रशांत नाईक यांनी पालकमंत्री महोदयांना विनंती केली होती.



ही मागणी मान्य करीत पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आवश्यक तो निधी तात्काळ उपलब्ध करून देण्याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

या क्रीडा संकुलात सेमी ऑलिंपिक स्विमींग पूल, बॅडमिंटन कोर्ट, अत्याधुनिक सोयी–सुविधांसह प्रशस्त जिम, योगा रूम, कॅरम व टेबल टेनिस रूम आदी सुविधा असणार असून हे काम आता अंतिम टप्प्यात आहे.

यावेळी पोलीस अधीक्षक अशोक दुधे, उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, गटनेते प्रदीप नाईक, अलिबाग नगर परिषद बांधकाम सभापती अजय झुंजारराव, नगरसेवक अनिल चोपडा, वृषाली ठोसर, चित्रलेखा पाटील, संजना कीर आदी उपस्थित होते.

# उरण मधील आदिवासींच्या व्यवसायावर लॉकडाऊनची कुऱ्हाड ; परवड होत असल्याने उदरनिर्वाहावर फटका



**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या व्हायरसने दुसऱ्या लाटेत राज्यात पुन्हा एकदा डोकं वर काढत थैमान माजवले आहे. दररोज वाढणारे संक्रमित रुग्णांचे आकडे यामुळे शासनाच्या आरोग्य विभागासह सर्वच आस्थापनांची तारांबळ उडाली असून, त्यामुळे पुन्हा एकदा शास–नाला लॉकडाऊन करावे लागले.

त्यात जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी सकाळी ७ ते ११ अशी वेळ देण्यात आली होती. मात्र डोंगराच्या कडेकपरित वास्तव्य करणाऱ्या आदिवासी महिला भगिनी कुटुंबाच्या पोटाची खळगी भरण्यासाठी जंगलातील डोंगर – दऱ्या पालथ्या घालून येतांना दिवसाचा बहुतेक वेळ जात असल्याने दिवस भरात जंगल उन्हातान्हात अतिशय मेहेनतीने आण–लेली विविध प्रकारची कंदमुळे व शेवली पालेभाजी आणि माणसाच्या शरीराला अत्यंत गुणकारी असलेली जांभळे विकण्यासाठी उरण बाजारपेठेत येतात.

मात्र कोरोना संसर्गाच्या लॉकडाऊनच्या नियमामुळे बाजारपेठेत जंगलातुन आण–लेले कंदमुळे आणि शेवली पालेभाज्यांना गिऱ्हाईक येत नसल्याने दिवसभरच्या मेहेंतीवर पाणी सारावे लागण्याची वेळ आदिवासींवर येत आहे.त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांच्या रोजीरोटीचा प्रश्न गहन बनत चालला आहे.

त्यांची परवड होत आहे.बाजाराला पोटाची खळगी भरायला येणाऱ्या आदिवासींसाठी ही वेळ बेताची ठरत आहे. या कोरोनाचा आदिवासिंच्या रोजग–ारावर मोठा फटका बसत असून, त्यांना उपासमारीची वेळ आली आहे.

उरण तालुक्यातून उरण बाजार पेठेत येत असतात. बाजारपेठेतील महाराष्ट्र स्वीट जवळ, गांधी चौक, राजपाल नाका, आनंद नगर आदी ठिकाणी बसून कंदमुळे, करांदे, शेवली, जांभळे आदी विकतांना दिसत आहेत. आदिवासीं, कातकरी, दुर्गम भागात राहत असल्याने मिळेल ते काम करायचे आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचा. महिला देखील दिवसभर कष्ट करतात. शेतात पिकवलेल्या गावठी भाज्या, करवंद, असे बाजारात विकून पोटाची खळगी भरायची.

मात्र कोरोनाच्या लॉकडाऊनमुळे बाजारातील ठरलेल्या वेळेअभावी या आदिवासींच्या रोजगारावर कुऱ्हाड कोसळली असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात परवड होतांना दिसत आहे. शासनाने बाजारपेठेची ठरविलेली वेळ पाहाता त्यांच्या व्यवसायाला वेळ मारक ठरत असून, गिऱ्हाईक मिळणे दुरापास्त होत असल्याचे चित्र बाजारपेठेत दिसत आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव व त्यामुळे वाढणारी कोरोना संक्रमित रुग्ण संख्या यामुळे शासनाने लॉकडाचा निर्णय घेतला. लॉकडाऊन असला तरी सकाळी ७ ते ११ ही वेळ जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदी व विक्रीसाठी दिली आहे. ही वेळ आदिवासींनी पाळायची म्हटली तर त्यांच्यासाठी हे मोठे दिव्य आहे.

> आम्ही गावठी भाजी आण–तो पण येईपर्यंत उशीर झाला की भाजी विकली जात नाही. एकतर लांबून यावे लागत. त्यात भाजी पण शिल्लक राहते. एवढी मेहनत करून पिकवलेली भाजी डोळ्यादेखत सुकून गेल्याने डोळ्यात पाणी येत आहे.
>
> **सगुणाबाई कातकरी - चिरनेर**

# तळा शहरात पिसाळलेल्या कुत्र्याची दहशत ; अकरा जणांना घेतला चावा



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात सध्या पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत पसरली असून शहरातील अकरा नागरिकांचा एका पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतला दिवसें दिवसभटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याने नागरिकांकडून कुत्र्यांची नसबंदी करण्याची मागणी वृतपत्राचे माध्यमातून करण्यात आली होती.

तळा शहरात भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवाने नागरिक त्रस्त झाले आहेत. सुरुवातीला अगदी नगण्य असलेली कुत्र्यांची संख्या अगणीक संख्यावर जाऊन पोहचली आहे. अशातच शुक्रवारी तळा शहरातील अकरा जणांना एका पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. अंधाराचा फायदा घेऊन बाजारपेठेत हे कुत्रे जाणाऱ्या येणाऱ्या बाईक स्वारांवर भुंकत जाऊन पाठलाग करीत असल्याने अपघात घडण्याची शक्यता आहे.

भटक्या कुत्र्यांचा बस स्थानकात वावर असल्याने बाहेरील प्रवासी स्थानकात थांबण्यास देखील घाबरतात भटक्या कुत्र्यांची एवढी दहशत पसरली आहे की नागरिक रात्रीच्या वेळी शतपवलीसाठी ही बाहेर पडत नाहीत. रात्रीच्या वेळेस सर्वच्या सर्व कुत्रे टोळीने भुंकत फिरत असल्याने नागरिकांची झोपमोड होते. सद्या प्रजनन काळ असल्याने मोठ्या प्रमाणावर कुत्र्याचा सुळसुळाट झाला आहे. त्यामुळे सर्वत्र कुत्र्याची दहशत निर्माण झाली आहे. तरी भटक्या कुत्र्यांची वेळीच नसबंदी तळानगरपंचायत व पशू आरोग्य विभागाने करण्याची मागणी तळावासीयांकडून करण्यात येत आहे.

# श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर पडलेली सुरुची झाडे कापून तेथेच ठेवण्यात आल्यामुळे नवीन लागवड कशी काय होणार?

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

साधारण २५ ते ३० वर्षापूर्वी श्रीवर्धन समुद्रकिनारी सुरूच्या झाडांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली होती. ही झाडे एवढी घनदाट होती की, त्या ठिकाणी सूर्यकिरण येतच नसत व वातावरण देखील थंड राहात असे. सुरुची लागवड होण्याअगोदर श्रीवर्धन समुद्रकिनारी मोठमोठी केतकीची बने होती. परंतु कालांतराने वाढलेली लोकसंख्या व समुद्रावरील वर्दळ वाढल्यामुळे सदर केतकीची बने हळूहळू नष्ट होऊ लागली होती.

केतकीची बने वाढविण्यामागचा हा मुख्य उद्देश असावा की, पावसाळ्यामध्ये समुद्रावरती फार मोठ्या प्रमाणावरती वारा सुटतो सदरचा वारा गावामध्ये थेट येऊ नये तो वारा प्रथम अडवला जावा यासाठी केतकीची बने खूप मोठ्या प्रमाणावर वाढवलेली होती. नंतर पावसाळ्यात येणारा वारा आडवण्याचे काम सुरुची झाडे करत होती. परंतु निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा श्रीवर्धन, हरिहरेश्वर समुद्र किनाऱ्याला बसल्यामुळे सुरुची ९० टक्के झाडे पडून गेली आहेत. सदर पडलेली सुरूची झाडे उचलून त्या ठिकाणचा परिसर साफ करण्याबाबत अनेक वेळा आवाज उठवल्यानंतर वनखात्याने याची जाहीर निविदा काढून सुरुची झाडे कापण्याचे व झाडांचे बुंधे जमिनीतून उखडून काढून जमीन नवीन लागवडीयोग्य करण्याबाबतच्या कामाचा ठेका काढलेला होता. सदर ठेकेदाराने झाडे त्याठिकाणी कापून ठेवली. त्यातील जी उपयुक्त होती ती झाडे ठेकेदार घेऊन गेला. उरलेली मोठी झाडे किंवा पिंजलेली झाडे ठेकेदाराने अद्याप त्या ठिकाणीच ठेवलेली आहेत. त्याचप्रमाणे कापलेल्या झाडांचे बुंधे देखील अद्याप काढण्यात आलेले नाहीत. जून महिना पंधरा दिवसांवर येऊन ठेपला आहे.

जून महिन्यात पहिला पाऊस झाल्यानंतर सुरूच्या झाडांची नवीन लागवड करण्यात येईल असे वनखात्याने खासदार सुनील तटकरे यांनी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये सांगितले होते. सुरूच्या नवीन झाडांची लागवड करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण भविष्यात पुन्हा वादळ आल्यास त्यापासून श्रीवर्धन शहराचे संरक्षण होईल. परंतु वनखात्याकडून सदर ठेकेदाराला अद्यापपर्यंत ती झाडे उचलून त्या ठिकाणचा परिसर स्वच्छ करण्याबाबत कोणतीही सूचना दिली गेल्याचे दिसून येत नाही. तरी जिल्हा वनक्षेत्रपाल यांनी सदरच्या ठेकेदाराला परिसर स्वच्छ करून त्याठिकाणी कापून ठेवलेली झाडे उचलून देण्याबाबत तातडीने सूचना द्यावा अशी मागणी पर्यावरणप्रेमी नागरिकांमधून होत आहे.

### करोनाने अनाथ झालेल्या बालकांसाठी...

# जिल्हा कृतीदल चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ या क्रमांकावर माहिती द्यावी : जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

करोनामुळे निधन झाल्यानंतर त्या पालकांवर अवलंबून असलेल्या बालकांच्या जीवनावरही गंभीर परिणाम होत आहेत. अशा बालकांच्या काळजी व संरक्षणासाठी कृती दल (Task Force) तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यानुषंगाने कोविड–१९ साथीच्या पार्श्वभूमीवर बालकांची काळजी व संरक्षणासाठी तयार करण्यात आलेल्या कृतीदलाची बैठक्ष नुकतीच जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील, बाल कल्याण समिती सदस्य, रोशनी ठाकूर, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सुजाता सपकाळ, चाईल्ड लाईन सदस्य उपस्थित होते.

करोनामुळे दोन्ही पालकांचा मृत्यू झाल्यानंतर निराधार झालेल्या बालकांची माहिती जनतेने द्यावी. निराधार बालकांच्या संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी जिल्हा कृती दलामार्फत घेण्यात येणार असून निराधार बालकांना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

जिल्हा कृती दलाच्या माध्यमातून या बालकांच्या संरक्षणासाठी केलेल्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात येवून त्या बालकास बालगृहात दाखल करून घेण्यात येणार आहे. यासाठी चाईल्ड हेल्पलाईन क्र.१०९८ यावर सुध्दा संपर्क साधता येईल. करोनामुळे दोन्ही पालकांचा मृत्यू झालेल्या ० ते ६ वर्ष या वयोगटातील बालकांसाठी एक शिशुगृह व ६ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी दोन बालगृह निश्चित केली आहेत. यासंदर्भातील माहिती कोविड हॉस्पिटल व मदत केंद्रांनासुध्दा उपलब्ध करून दिल्यामुळे मदत उपलब्ध करुन देणे सुलभ झाले आहे. अडचणीत सापडलेल्या बालकांबाबत संबंधित रुग्णालयाने तात्काळ माहिती कळवावी तसेच अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, रायगड अलिबाग येथे ०२१४१–२९५३२१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा, असे आ–वाहन प्र.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रायगड अलिबाग अशोक पाटील यांनी केले आहे.

# कोरोना काळात तृतीयपंथियांना एक हात मदतीचा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रा–तील तृतीयपंथियांना (एलजीबीटी) पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या सहकार्याने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

कोरोना काळात निर्माण झालेल्या कठीण परिस्थितीचा फटका गोरगरीबांपासून ते श्रीमंतांपर्यंत समाजातील सर्वच घटकांना बसला आहे. यामध्ये विविध संस्था, राजकीय पुढाऱ्यांकडून मदतीचा ओघ सुरू आहे. समाजातील दुर्लक्षित असलेल्या अशा तृतीयपंथियांना पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या सहकार्याने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.



पालकमंत्री यांनी दिलेल्या आदेशानुसार तहसीलदार विजय तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी संदीप रोडे यांनी पनवेल तालुक्यातील तृतीयपंथिय (एलजीबीटी) समाजातील घटकांचे सर्वेक्षण करून त्यांच्या पर्यंत तांदूळ, डाळ, चहा, मसाले, खाद्यतेल इत्यादी जीवनावश्यक वस्तूंचे किट सुपूर्द करण्यात आले.

# लोकनेत्यांच्या वाढदिवसानिमित्त एक हात मदतीचे अभियान

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

लोकनेते मा. खासदार रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७० व्या वाढदिवसाचे अवचित साधून गरजू जनतेला एक मदतीचा हाथ म्हणून कळंबोली वसाहतीमधील हजारो गरीब व गरजू नागरिकांना मोफत वाटपाचा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी धान्य वाटप केल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता . लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दीर्घ आयुष्य लाभू दे असे आशीर्वादही नागरिकांनी दिले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त समाजपयोगी असे विविध उपक्रम कळंबोली सह पनवेल मध्ये राबविण्यात आले आहेत. या अभियानाचा फायदा समाजातील तळा–गाळातील लोकांना मोठ्या प्रमाणात मिळा–लेला आहे. वैद्यकीय आरोग्य शिबीर अपंग,



विद्यार्थी, कला क्रीडा सामाजिक कार्यात काम करणाऱ्या नागरिकांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त नागरिकांना विविध योजनांच्या माध्यमातून मदत करण्यात आली आहे. लोकनेत्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कळंबोली मध्ये गरीब व गरजू तळागाळातील नागरिकांना धान्य वाटपाचे किट वाटप करण्यात आले. यावेळी सोशल डिस्टंसिंग चे व्यवस्थित पालन करून नागरिकांनी धान्य वाटपाचे किट स्वीकारले. करोणा काळात अनेकांचे रोजगार हिरावून गेले आहेत.

त्यामुळे उदरनिर्वाहाचा प्रश्नही गंभीर बनला आहे .हीच महत्त्वाची गंभीर बाब ध्यानात घेऊन लोकनेत्यांनी वाढदिवसाचे औचित्य साधून मोफत धान्य व किराणा वस्तूंचे वाटप करण्याचे नियोजन केले आहे. या कार्यक्रम नगरसेवक बबन मुकादम, मा. सभापती नगरसेवक अमर पाटील, नगरसेवक हरेश केणी, कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील, नगरसेविका प्रमिला पाटील, मा. सभापती प्रिया मुकादम, भाजप कार्यकर्ते कमल कोठारी, बबन बारगजे, प्रकाश शेलार, अमर ठाकूर, प्रकाश मुंबईकर, दिलीप बिष्ट, सिद्धेश बनकर व आदी मान्यवर उपस्थित होते.